# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७ २६९२१०२.

E-mail : mcm.dte@gmail.com Internet : http://www.dte.org.in/mcm

**कालमर्यादित**

क्र. ३/तंशिसं/Con./२०१३/05

दिनांकः- 05/04/2013

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद /

अमरावती / नागपूर.

विषय :- **"Result & Concession Management" मध्ये विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत करणेबाबत**

उपरोक्त विषयासंदर्भात संचालनालयाने "Online Result & Concession Management System" ही प्रणाली शासनातर्फे विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या विविध शैक्षणिक सवलती बद्दल माहिती अद्ययावत करण्यासाठी विकसित केलेली आहे. मा. मुख्यमंत्री कार्यालयाने या सवलती घेणा-या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे विश्लेषण करण्याचे सूचित केलेले आहे. तसेच शासनाने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची माहितीही मागविलेली आहे.

तरी आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / शासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थाची खालील सर्व माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या प्रणालीद्वारे तात्काळ भरण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात व ही माहिती संबंधित संस्थांनी दि. ५.४.२०१३ ते ८.४.२०१३ पर्यंत अद्ययावत करावी व त्यांचा अहवाल दि. ९.४.२०१३ पर्यंत आपल्या कार्यालयास सादर करावा व त्याची ऑनलाईन पध्दतीने नोंद घ्यावी. तसेच त्याबाबत पाठपुरावाही करावा, जेणेकरुन सदर माहिती मा. प्रधान सचिव यांना सादर करणे या संचालनालयास सुलभ होईल.

सदर प्रकरणी तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई अंतर्गत विविध अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. तसेच प्रवेश मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांना Unique Application ID दिला जातो व विद्यार्थ्यांची सर्व माहिती संकलित केली जाते. विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय व शाखानिहाय सर्व माहिती या प्रणालीद्वारे सर्व संस्थांना उपलब्ध करुन दिली आहे. यासाठी संस्थांनी त्यांना दिलेला चार अंकी कोड व पासवर्ड वापरुन Log in करावे व विद्यार्थ्यांची प्रत्येक शैक्षणिक वर्षाची आवश्यक ती अद्ययावत माहिती भरावी. माहिती अद्ययावत करण्यासंदर्भात सूचना व मॅन्युअल सर्व संस्थांना त्यांच्या Log in मध्ये उपलब्ध करुन देण्यांत आले आहे.

( डॉ. सुभाष महाजन )

प्र. संचालक,

तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

प्रत –

१) उपसचिव, तंत्रशिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

२) प्राचार्य, सर्व शासकीय / शासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्था यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त माहिती ही तात्काळ भरुन या कार्यालयास अवगत करावे.

\\192.168.1.8\itdc\AMJ_DATA\IT Cell Correspondance\IT Cell Letters.doc